# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई- ४०० ०५१.
फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९ ई-मेल- jtdirrom@gmail.com

क्र.४/विकामुं/तांत्रिक-३/प्रवेश /२०१८/२६५७
दिनांक : 1-2 AUG 2018

प्रति,
प्राचार्य/संचालक
सर्व विनाअनुदानित पदवी व पदव्युत्तर पदवी
अभ्यासक्रमाच्या संस्था

विषय : व्यायसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थास्तरीय व केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहणा-या जागांवर प्रवेश करण्यासंदर्भात सुचना.
संदभ : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे परिपत्रक क्र. २अ/ एडीएम/२०१८/९६७अ दि. ३१.७.२०१८

उपरोक्त विषयानुसार आपणांस कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे केंद्रीभुत प्रवेश फे-या संपन्न होत आहेत. संस्थास्तरीय कोटयातील जागा, अल्पसंख्यांक कोटयातील जागा तसेच केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागांवर प्रवेशासाठीची कार्यपध्दती स्पष्ट करण्यांत आलेली आहे. संचालनालयाचे संदर्भांकित परिपत्रकातील निर्देशाप्रमाणे रिक्त जागा भरणेबाबत संस्था प्रमुखांनी प्रवेश प्रक्रियेची कार्यवाही करावी. संदर्भांकित पत्राची प्रत सोबत जोडलेली आहे.

(जे.आर. निखाडे)
सहा.संचालक (तां)
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

प्रत:- १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई -०१ यांना माहिती करीता सादर
२. प्रोग्रॅमर, सदर पत्र व परिपत्रक सहसंचालकांच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करावे.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी - 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.

E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


परिपत्रक/महत्वाचे क्रमांक : २अ/एडीएम/२०१८/९६८ अ

दिनांक : 31 JUL 2018

विषय : व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थास्तरीय व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहणा-या जागांवर प्रवेश करण्यासंदर्भात सूचना

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या पदवी , पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे केंद्रीभूत प्रवेश फे-या संपन्न होत आहेत. शासनमान्य प्रवेश नियम तसेच , पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या शासन राजपत्र असाधारण क्रमांक १०४ दिनांक २४.४.२०१७ मधील प्रवेश नियमावलीमधील मुद्दा क्रमांक १३ व दिनांक ५.६.२०१८ रोजीच्या शासन राजपत्र असाधारण क्रमांक २०२ अन्वये निर्गमित सुधारीत प्रवेश नियमावलीमधील मुद्दा क्रमांक ९ नुसार संस्थास्तरीय कोटयातील जागा, अल्पसंख्याक कोटयातील जागा आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागावर प्रवेशासाठीची कार्यपध्दती स्पष्ट करण्यात आलेली आहे. त्यानुसार विना अनुदानित संस्थेचे संचालक किंवा प्राचार्य, यांनी प्रवेशाबाबतची कार्यवाही करणे आवश्यक आहे. सदर रिक्त जागा भरणेबाबत संस्थेने प्रवेशाबाबतचे वेळापत्रकासोबत केंद्रीभूत प्रवेश फेरीनंतर शिल्लक राहिलेल्या जागांची संख्या त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणे आवश्यक आहे.

राज्यातील सर्व व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांवर संस्थास्तरीय कोटयातील जागा, अल्पसंख्याक कोटयातील जागा आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागावर प्रवेशासाठी वरील तरतूदी बंधनकारक असून त्यानुसार प्रवेश करण्यात यावेत.

( डॉ.अभय वाघ )

संचालक, तंत्रशिक्षण ,महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत माहितीस्तव अग्रेषित :

१.मा.सचिव,महाराष्ट्र शासन,उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन,मुंबई ४०००३२

२. मा.आयुक्त,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य,मुंबई

३.मा.सचिव,प्रवेश नियामक प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत : माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

१. सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपुर - त्यांना कळविण्यात येते की, वरील परिपत्रक आपल्या विभागाच्या अधिनस्त सर्व तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांना त्यांच्या सूचनाफलकावर दर्शनी भागात दिसेल अशा ठिकाणी प्रदर्शित करण्याबाबत कळविण्यात यावे.
२. कार्यासन क्रमांक ३,(माहिती तंत्रज्ञान शाखा ) मुख्य कार्यालय ,मुंबई -त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.

E:\Budage\2018-19\General Correspondence\Insitute level admission instruction.docx

RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष ३, अंक ४४(५)] सोमवार एप्रिल २४, २०१७/वैशाख ४, शके १९३९ [पृष्ठे ३६, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक १०४

## प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

उच्च व तंत्रशिक्षण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ एप्रिल २०१७

### अधिसूचना

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५.

क्रमांक टीईएम. २०१६/सीआर ४७३ (भाग -३)/टीई-४.—महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम,२०१५ (सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम २८) च्या कलम २३ व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, शासन अधिसूचना उच्च व तंत्रशिक्षण, क्रमांक टीईएम. २०१५/सीआर ५३६/टीई. ४, दिनांक ११ मार्च २०१६ अधिक्रमित करून, महाराष्ट्र शासन याव्दारे पूर्णवेळ व्यावसायिक पदवीपूर्व तांत्रिक पाठयक्रमांच्या प्रथम वर्ष व थेट व्दितीय वर्षांना (अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र आणि हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान) द्यावयाचे प्रवेश विनियमित करण्यासाठी पुढील नियम करीत आहे:—

१. संक्षिप्त नाव व प्रारंभ.—

(१) या नियमांना, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (पूर्ण वेळ व्यावसायिक पदवीपूर्व तांत्रिक पाठयक्रमांच्या प्रवेशाचे विनियमन), नियम, २०१७ असे म्हणावे.

(२) ते दिनांक २४ एप्रिल २०१७ पासून अंमलात येतील.

२. व्याख्या.— (१) या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " अधिनियम " याचा अर्थ, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ (सन २०१५ चा महा. २८), असा आहे ;

(ख) " प्रवेश उपस्थिती केंद्र " याचा अर्थ, जेथे उमेदवार प्रवेशाबाबतची कागदपत्रे सादर करून आणि शुल्काचा भरणा करून प्रवेश निश्चित करण्यासाठी उपस्थित राहील असे केंद्र, असा आहे ;

(ड) सर्व राखीव प्रवर्गातील उमेदवारांना (विशेष मागासप्रवर्ग उमेदवाराचा त्यांच्या मूळ प्रवर्गामध्ये) त्यांच्यासाठी राखीव जागावर सर्व टप्प्यावर परस्पर गुणवत्तेच्या आधारे जागा वाटपासाठी विचार केला जाईल;

(च) क्रम वर सरकल्यामुळे रिक्त होणा-या जागांचा, त्या टप्प्याच्या जागा वाटपाच्या तरतुदीनुसार त्याच टप्प्यावरील पुढील प्रक्रियेमध्ये जागा वाटप करण्याकरिता विचार करण्यात येईल;

(छ) भरण्यात आलेल्या पसंतीक्रमामधील पहिल्या उपलब्ध विकल्पानुसार करण्यात आलेले वाटप हे अंतिम जागा वाटप म्हणून अबाधित ठेवण्यात येईल;

(ज) संकेत स्थळावर प्रदर्शित करण्यात आलेल्या जागा वाटपाच्या यादीमध्ये, उमेदवारांना देऊ करण्यात आलेल्या तात्पुरत्या जागांचे वाटप दर्शविण्यात येईल. या संदर्भात उमेदवारांशी व्यक्तिशः कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही किंवा त्यांना जागावाटप पत्रे पाठविली जाणार नाहीत;

(झ) ज्या उमेदवारास जागेचे वाटप करण्यात आले असेल तो उमेदवार " तात्पुरते जागावाटप पत्रर " संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन घेईल. जागा-स्वीकृतीच्या वेळेस उमेदवारास प्रवेश उपस्थिती केंद्रावर सक्षम प्राधिका-याच्या नावे दर्शनी धनाकर्ष जमा करावा लागेल. मूळ कागदपत्रांची पडताळणी केल्यावर आणि उमेदवार सर्व पात्रता निकषांची पूर्तता करत असल्याची खात्री पटल्यावर उपस्थिती केंद्राकडून जागा नक्की केली जाईल व केंद्र प्रभारी, स्वीकृतीची संगणकीय पावती देईल;

(त्र) जागा-स्वीकृती शुल्क, सर्वसाधारण प्रवर्गातील, विमुक्त जाती/निरधिसूचित जमाती/भटक्या जमाती/विशेष मागासवर्ग व इतर मागासवर्ग प्रवर्गातील उमेदवारांसाठी रु. ५,००० आणि अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवारांसाठी रु. १,००० एवढे असेल. हे शुल्क कॅप प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर उमेदवार संबंधित संस्थेत उपस्थित झाल्यास रू. १,००० एवढे प्रक्रिया शुल्क वजा करून, संस्थेच्या बँक खात्यात इलेक्ट्रॉनिक पद्धतीने हस्तांतरित केले जाईल आणि उमेदवाराने संस्थेला द्यावयाच्या शुल्कापोटी समायोजित केले जाईल. परंतु जर उमेदवाराने संस्थेत उपस्थित होण्यापूर्वी एआरसी केंद्रावर प्रवेश रद्द केला तर, प्रक्रिया शुल्काचे रु. १,००० वजा करून उर्वरित रक्कम इलेक्ट्रॉनिक पद्धतीने उमेदवारास परत करण्यात येईल ;

(ट) जागा स्वीकृतीकरिता व्यक्तिशः उपस्थित न राहणे म्हणजे उमेदवाराने देऊ केलेली जागा नाकारली असल्याचे समजण्यात येईल;

(ठ) जर कोणतीही कागदपत्रे किंवा प्रमाणपत्रे विधिअग्राहय किंवा खोटी असल्याचे कोणत्याही वेळी आढळून आले आणि/किंवा उमेदवाराने पात्रता निकषांची पूर्तता केली नाही तर वाटप करण्यात आलेली जागा कोणत्याही वेळी रद्द करण्यात येईल;

(ड) ज्या उमेदवारांना वाटप करण्यात आलेली जागा नाकारावयाची असेल त्यांना स्वीकृती शुल्क भरण्यासाठी प्रवेश उपस्थिती केंद्रावर जाण्याची आवश्यकता नाही. वाटप केलेली जागा नाकारणा-या उमेदवारांना उर्वरित प्रवेश फे-यामध्ये भाग घेण्यासाठी वेळापत्रकानुसार नवीन विकल्प अर्ज सदर करावा लागेल.

(ण) उमेदवार,अर्ज स्वीकृतीकेंद्रावर (एआरसी) जागा स्वीकृती शुल्क भरल्यानंतर जर संबंधित संस्थेमध्ये प्रवेशासाठी उपस्थित राहिला नाही तर अशा उमेदवाराचे जागा स्वीकृती शुल्क जप्त केले जाईल.

१३. **संस्थास्तरीय कोट्यातील जागा, अल्पसंख्याक कोट्यातील जागा आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागावर प्रवेश,-विना अनुदानित संस्थेचे संचालक किंवा प्राचार्य, या जागांवरील प्रवेश प्रक्रिया खालील पद्धतीचा वापर करून पार पाडतील,—**

(क) उपलब्ध जागावर प्रवेश हे पारदर्शक रीतीने व ज्यांनी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी व नंतर संस्थेकडे प्रवेशासाठी आवेदनपत्र सादर केलेले आहे अशा सर्व उमेदवारांच्या परस्पर गुणवत्तेनुसार करण्यात येतील;

(ख) प्रवेशप्रक्रिया सुरू करण्यापूर्वी पुरेसा वेळ मिळेल अशा रीतीने संस्थेची माहिती व प्रवेशाचे नियम विनिर्दिष्ट केलेले असतील अशी पुस्तिका किंवा निर्देशपुस्तिका प्रकाशित करण्यात यावी. माहिती पुस्तिकेमधील सर्व माहिती संस्थेच्या संकेतस्थळावर देखील प्रदर्शित करण्यात यावी;

(ग) प्रत्येक संस्था, प्रवेशाचे वेळापत्रक आणि संस्थेकडून प्रत्येक पाठ्यक्रमातील भरावयाच्या एकूण जागांची संख्या यांची जाहिरात संस्थेच्या संकेतस्थळावर आणि सक्षम प्राधिकारी यांचे संकेत स्थळावर त्यांनी निश्चित केलेले शुल्क भरून अधिसूचित करतील व आवेदनपत्र मागवतील;

(घ) प्रवेशासाठी वेळोवेळी शासनाने अधिसूचित केलेले व समुचित प्राधिका-याने विनिर्दिष्ट केलेले पात्रतेचे निकष पूर्ण करणारे इच्छुक उमेदवार हे संस्थेचे संचालक किंवा प्राचार्य यांच्याकडे संस्थास्तरावरील प्रवेशासाठी नियम ३(४)(ख) मध्ये तरतूद केल्यानुसार आवेदनपत्र सादर करतील व या जागा ते या नियमांच्या नियम ८(३) मध्ये विनिर्दिष्ट केलेली कार्यपद्धती अनुसरून तयार करण्यात आलेल्या परस्पर गुणवत्ता यादीतील गुणानुक्रमे भरतील;

(ङ) संस्था, संस्थास्तरावर संस्थास्तरीय कोट्यातील जागा, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागा, भारताचे समुद्रपार नागरिक/भारतीय वंशाच्या व्यक्ती/विदेशी विद्यार्थी/आखाती देशातील भारतीय कामगारांची मुले या अधिसंख्य कोट्यातून प्रवेश द्यावयाच्या उमेदवारांची गुणवत्ता यादी (याद्या) संस्थेच्या सूचनाफलकावर व संकेतस्थळावरसुद्धा प्रसिद्ध करील;

(च) विनिर्दिष्ट केलेल्या पाठ्यक्रमांच्या संस्थास्तरीय कोट्यातील जागा (अंशतः किंवा पूर्णतः) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेला परत करण्याचा उद्देश असणा-या अल्पसंख्याक किंवा अल्पसंख्याकेतर संस्था, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या प्रत्येक फेरीतील जागेची रचना प्रदर्शित करण्यापूर्वी दोन दिवस अगोदर तसे कळवतील आणि त्या जागांचे, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या नियमांनुसार वाटप करण्यात येईल;

(छ) घेतलेल्या आणि रद्द केलेल्या सर्व प्रवेशाबाबतची माहिती संगणकीय (ऑनलाईन) प्रणालीमार्फत तात्काळ संस्था अद्ययावत करतील;

(ज) जर केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या फे-या पार पडल्यानंतर केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची जागा रिक्त राहिल्यास किंवा झाल्यास ती जागा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेदरम्यान ज्या प्रवर्गाकरिता राखून ठेवलेली होती, त्या प्रवर्गाच्या उमेदवारामधूनच भरण्यात येईल. तद्नंतरही जागा रिक्त राहिल्यास, त्या जागा अर्जदाराच्या परस्पर गुणवत्तेच्या आधारे भरण्यात येतील.

१४. **गुणवत्ता यादी व प्रवेश देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या यादीस मान्यता,—**

(१) प्रवेशप्रक्रिया संपल्यानंतर, अधिनियमाच्या कलम ९ च्या पोट-कलम (५) मध्ये नमूद केल्यानुसार प्रत्येक विना अनुदानित खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्था, संचालक तंत्र शिक्षण व प्रवेश नियंत्रण प्राधिकरण यांचेकडे प्रवेश मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करतील.

(२) प्रवेश मान्यतेसाठीच्या प्रस्तावामध्ये संस्थास्तरावर प्रवेश देण्यात आलेल्या व कोटा असलेल्या अशा सर्व विद्यार्थ्यांची यादी, उमेदवारीचा प्रकार, आरक्षण, अर्हता इत्यादी तसेच संस्थास्तरावर प्रवेश दिलेल्या उमेदवारांच्या प्रवेशासाठीच्या आवश्यक कागदपत्रांचा समावेश असेल.

(३) जर एखाद्या अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थेने लागोपाठच्या तीन वर्षांच्या कालावधीत तिच्या मंजूर प्रवेश क्षमतेच्या किमान एकावन्न टक्के प्रवेश संबंधित अल्पसंख्यांक प्रवर्गातील व्यक्तींमधून देण्यात कसूर केली तर, सक्षम प्राधिकारी, त्याबाबतची माहिती विभागास कळवतील, विभागाकडून अशा संस्थाबाबतची माहिती व निरीक्षण अल्पसंख्यांक विकास विभागाकडे अधिनियमाच्या कलम ६ मधील पोट-कलम (२) मध्ये नमूद केल्यानुसार पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित करतील.

१५. **संस्थेद्वारे प्रवेश रद्द केल्यानंतर शुल्काचा परतावा,—**

(क) उमेदवार प्रवेश रद्द करण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज करील आणि प्रवेश रद्द करण्यासाठी असलेल्या प्रणाली निर्मित अर्जाची स्वाक्षरित प्रत संस्थेला सादर करील;

(ख) उमेदवाराकडून प्रवेश रद्द करण्याबाबत स्वाक्षरीत लेखी विनंती अर्ज सक्षम प्राधिकारी यांनी दिलेल्या वेळापत्रकानुसार प्राप्त झाल्यानंतर, संस्था तात्काळ ऑनलाईन पद्धतीने प्रवेश रद्द करील आणि संस्थेच्या लॉगईन मधून प्रवेश रद्द केल्याबाबत संगणकीय (ऑनलाईन) पोच तयार करील आणि उमेदवाराला स्वाक्षरित प्रत देईल;

(ग) जर उमेदवाराने प्रवेशाच्या अंतिम दिनांकास (कट ऑफ दिनांकास ) किंवा त्यापूर्वी प्रवेश रद्द केल्यास, शुल्काचा परतावा, म्हणजेच एकूण शुल्कामधून रुपये १,००० एवढे प्रक्रिया शुल्क वजा करुन किंवा समुचित प्राधिकरणाने किंवा शासनाने वेळोवेळी निर्धारित केल्यानुसार देण्यात येईल;

(घ) जर सक्षम प्राधिका-याने घोषित केलेल्या प्रवेशाच्या अंतिम दिनांकाच्या नंतर प्रवेश रद्द केला असेल तर, प्रतिभूती ठेव आणि तारण धनठेव वगळता कोणताही परतावा मिळण्यास उमेदवार पात्र असणार नाही.

RNI No. MAHBIL/2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ४, अंक ७३(५)] मंगळवार, जून ५, २०१८/ज्येष्ठ १५, शके १९४० [पृष्ठे ११, किंमत : रुपये ०९.००

असाधारण क्रमांक २०२

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक ५ जून २०१८

अधिसूचना

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५.

क्रमांक टीईएम-२०१८/सी.आर. २६/टीई-४.---ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, अधिसूचना उच्च व तंत्रशिक्षण, क्रमांक टीईएम-२०१६/प्र.क्र. ४७३ (भाग-३)/तांशि-४, दिनांक २४ एप्रिल २०१७ द्वारे, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ (२०१५ चा महाराष्ट्र अधिनियम २८) च्या कलम २३ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून पूर्णवेळ व्यावसायिक पदवीपूर्व तांत्रिक पाठ्यक्रमांचे प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान द्यावयाचे प्रवेश विनियमित करण्यासाठी नियम केले आहेत. शासनास या नियमात सुधारणा करणे योग्य वाटते ;

आता, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था ( प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम , २०१५ (२०१५ चा महाराष्ट्र अधिनियम २८ ) च्या कलम २३ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे या नियमामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे, जसे :—

१. या नियमांना, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (पूर्ण वेळ व्यावसायिक पदवीपूर्व तांत्रिक पाठ्यक्रमांच्या प्रवेशाचे विनियमन) (सुधारित) नियम, २०१८ असे म्हणावे.

(सात) उमेदवारी प्रकारातील बदल ;

(आठ) विद्यापीठ बदल ;

(नऊ) आधारभूत कागदपत्र सादर न करू शकल्या मुळे शिक्षणशुल्क माफी अंतर्गत जागा मिळण्यासाठीच्या पात्रतेचा दर्जा काढून टाकणे ;

(दहा) थेट द्वितीय वर्ष प्रवेशाशी संबंधित गट/उप गट मधील बदल ;

(अकरा) शैक्षणिक अर्हता बदल.

वरील व्यतिरिक्त इतर कोणत्याही बाबतीत बदल किंवा दुरुस्ती करण्यास परवानगी नाही.

(च) अतिरिक्त फेरी (जर झाल्यास) बाबतीत, वरील खंड (क) मध्ये नमूद केलेल्या उमेदवारांना या फेरीत सहभागी होता येईल व त्यांना नवीन विकल्प नमुना भरता येईल. असे उमेदवार नवीन विकल्प नमुना भरताना त्यांना पूर्वीच्या फेरीमध्ये वाटप झालेला विकल्प त्यांच्या पसंतीक्रमाच्या यादीत नमूद करणार नाहीत, संगणकीय प्रणालीद्वारे तो विकल्प यादीच्या शेवटी समाविष्ट करण्यात येईल. जर वरच्या पसंतीक्रमानुसार नवीन जागेचे वाटप करण्यात आले की अगोदर करण्यात आलेले वाटप आपोआप रद्द होईल. वरच्या पसंतीक्रमानुसार नवीन जागेचे वाटप न झाल्यास पूर्वीच्या फेरीमधील वाटप अबाधित राहील ;

(५) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) अंतिम फेरीनंतर, उमेदवार त्यास वाटप केलेल्या संस्थेमध्ये विहित वेळापत्रकानुसार उपस्थित राहील व त्या संस्थेतील आपला प्रवेश कायम करील. संस्था आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करेल व उमेदवाराचा प्रवेश ऑनलाईन प्रणालीत संस्थेच्या लॉगइन मधून ताबडतोब अपलोड करेल व उमेदवारास प्रवेशाच्या पुष्टीसाठी ऑनलाईन प्रणालीतून मिळणारी पावती देईल. ''

७. मुख्य नियमातील नियम १०,—

(क) उप नियम (१), टप्पा-नऊ, खालीलप्रमाणे समाविष्ट करण्यात यावा, जसे :—

'' **टप्पा- नऊ : प्रथम वर्ष अभियांत्रिकी प्रवेशासाठी (पदविका उमेदवारासाठी)**,- टप्पा आठ पूर्ण झाल्यानंतर प्रथम वर्षातील जागा रिक्त राहिल्यास त्या जागाचे वाटप पदविकाधारक उमेदवारांना त्यांच्या परस्पर गुणवत्तेच्या आधारे करण्यात येईल. ''

(क) उप नियम (२), खंड (ख) व (ग ) खालील प्रमाणे समाविष्ट करण्यात यावा, जसे :-

''(ख) प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र - एनईईटी (NEET) मधील गुणांच्या आधारे व तद्नंतर जागा रिक्त असल्यास सीईटी परीक्षेतील गुणांच्या आधारे ;

(ग) प्रथम वर्ष वास्तुशास्त्र - वास्तुशास्त्र परिषदेद्वारे घेण्यात येणाऱ्या वास्तुशास्त्रामधील राष्ट्रीय अभियोग्यता चाचणी परीक्षेच्या (NATA) किंवा जेईई (मुख्य) - प्रश्नपत्रिका २ च्या गुणांच्या व एचएससी परीक्षेतील गुणाच्या आधारे ; ''

८. मुख्य नियमातील नियम १२,—

(क ) उप नियम (झ) मध्ये, '' प्रवेश उपस्थिती केंद्रावर '' या शब्दानंतर '' जागा-स्वीकृती शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरतील किंवा '' या शब्दांचा समावेश करण्यात यावा.

(ख ) उप नियम (त्र), खालील प्रमाणे समाविष्ट करण्यात यावा, जसे :—

'' (त्र) सर्व उमेदवारांसाठी जागा-स्वीकृती शुल्क, रु. १,००० एवढे असेल. हे शुल्क ना-परतावा प्रक्रिया शुल्क असेल ; ''.

(ग ) खंड (ण ), वगळण्यात यावा.

९. मुख्य नियमातील नियम १३,—

(क) उप नियम (ग) मधील ''आणि सक्षम प्राधिकारी यांचे संकेतस्थळावर त्यांनी निश्चित केलेले शुल्क भरून '' असे शब्द वगळण्यात यावे.

(ख ) उप नियम (ड.) मधील " संस्था " या शब्दासाठी, " संस्था आवश्यक सर्व कागदपत्रांची पडताळणी करून " अशा शब्दांचा समावेश करण्यात यावा.

(ग ) उप नियम (च ), खालीलप्रमाणे समाविष्ट करण्यात यावा, जसे :—

" (च) विनिर्दिष्ट केलेल्या पाठ्यक्रमांच्या संस्थास्तरिय कोट्यातील जागा (अंशत: किंवा पूर्णत:) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेला परत करण्याचा उद्देश असणाऱ्या अल्पसंख्याक किंवा अल्पसंख्याकेतर संस्था, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या फेरीतील जागेची रचना प्रदर्शित करण्यापूर्वी दोन दिवस अगोदर तसे कळवतील आणि त्या जागांचे, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या नियमांनुसार वाटप करण्यात येईल. तद्नंतर संस्थास्तरिय कोट्यातील जागा प्रत्यार्पित करण्याची मुभा संस्थांना नसेल ; "

१०. मुख्य नियमातील नियम १५, खालीलप्रमाणे समाविष्ट करण्यात यावा, जसे :—

" १५. *प्रवेश रद्द करणे व शुल्काचा परतावा, संस्थेद्वारे कागदपत्र परत देणे,—*

(क) उमेदवार प्रवेश रद्द करण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज करील आणि प्रवेश रद्द करण्यासाठी असलेल्या प्रणाली निर्मित अर्जाची स्वाक्षरित प्रत संस्थेला सादर करील. उमेदवाराने प्रवेश रद्द करण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने विनंती सादर केल्यानंतर उमेदवाराचा प्रवेश रद्द झाला असे समजण्यात येईल. उमेदवाराने प्रवेश रद्द करण्यासाठी असलेल्या प्रणाली निर्मित अर्जाची स्वाक्षरित प्रत संस्थेला सादर केली किंवा नाही याबाबत काहीही असले तरी संस्था, उमेदवाराने प्रवेश रद्द करण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने सादर केलेली विनंती अंतिम मानेल. अशाप्रकारे जागा रद्द झाल्याने उमेदवार त्या जागेवरील हक्क गमावेल व ती जागा पुढील वाटपासाठी उपलब्ध होईल. तद्नंतर उमेदवार शुल्क परताव्याचा दावा करू शकेल व प्रणाली निर्मित अर्जाची स्वाक्षरित प्रत संस्थेला सादर केल्याच्या दोन दिवसाच्या आत संस्था प्रक्रिया शुल्क म्हणून रुपये १००० वजा करून शुल्क परतावा आणि उमेदवारास सर्व मूळ प्रमाणपत्रे परत करेल ;

(ख) वरील (क) मध्ये नमूद असले तरीही, जर सक्षम प्राधिकाऱ्याने निर्धारित केलेल्या प्रवेशाच्या अंतिम दिनांकास संध्याकाळी ५ वाजल्या नंतर प्रवेश रद्द करण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज केला असल्यास उमेदवार प्रतिभूती ठेव आणि तारण धनठेव व्यतिरिक्त शुल्क परताव्यास पात्र असणार नाही ;

(ग) कोणतीही संस्था, ज्यांच्याकडे उमेदवारांनी त्यांची प्रमाणपत्रे, पदविका/पदवी, व इतर कागदपत्रे त्या संस्थेमध्ये प्रवेशासाठी जमा केलेली असतील, व जर उमेदवार अशा संस्थेमध्ये अभ्यासक्रम पुढे चालू ठेवण्यासाठी किंवा त्या संस्थेतील सुविधा घेण्यासाठी इच्छुक नसतील अशा प्रसंगी जमा करण्यात आलेली प्रमाणपत्रे, पदविका/पदवी, व इतर कागदपत्रे उमेदवारास परत करण्यास कोणत्याही प्रकारे विरोध करणार नाहीत किंवा त्यासाठी अशा अभ्यासक्रमाचे किंवा इतर कोणतेही शुल्क अदा करण्यासाठी त्याच्यावर दबाव टाकणार नाहीत. "

११. मुख्य नियमास जोडलेली अनुसूची-दोन, खंड-(दोन), खालीलप्रमाणे समाविष्ट करण्यात यावा, जसे :—

" (दोन) रिक्त जागा : या नियमाच्या नियम १६ मध्ये दिल्यानुसार संस्था व अभ्यासक्रम बदल केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या विचारात घेऊन मागील वर्षात (मंजूर प्रवेशक्षमतेतील) ज्या जागा रिक्त राहिल्या त्या जागासुद्धा आनुषंगिक प्रवेशासाठीच्या प्रवेशप्रक्रीयेद्वारे भरण्यात येतील. "

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

सतिश तिडके ,
शासनाचे उप सचिव.